क्रमांक:एमआयएस-०६१७/सीआर-५०/२०१७/तीन　　　　　　　　　　　　दिनांक :- १२ एप्रिल, २०१८

# घोषणा

**विषय**:-(१)परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी सादर करावयाच्या ओळखीच्या पुराव्याबाबत.
(२)परीक्षेकरीता उपकेंद्रावरील उमेदवारांच्या उपस्थितीच्या वेळेबाबत.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्रासोबतच त्यांचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक असल्याबाबत आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २४ जून, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेद्वारे सूचित करण्यात आले होते.

**२**. आयोगाच्या नवीन कार्यपध्दतीनुसार यापुढे आयोजित करण्यात येणा-या सर्व परीक्षांकरीता परीक्षेस येताना उमेदवाराने ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान **कोणतीही दोन मूळ ओळखपत्रे तसेच त्यांच्या छायांकित प्रती (दोन वेगवेगळया ओळखपत्रांच्या)** सोबत आणणे अनिवार्य आहे.

**३.** उमेदवाराने परीक्षेच्या वेळी वर नमूद ५ ओळखपत्रांपैकी कोणतीही दोन मूळ ओळखपत्रे व दोन्ही ओळखपत्रांच्या छायांकित प्रती सादर न केल्यास त्याचा परीक्षेस प्रवेश नाकारला जाऊ शकतो, याची उमेदवारांनी जाणिवपूर्वक नोंद घ्यावी.

**४.** परीक्षेच्या वेळी सादर करण्यात येणा-या उमेदवाराच्या दोन्ही मूळ ओळखपत्रावरील छायाचित्र उमेदवाराची ओळख पटविण्याइतपत सुस्पष्ट असणे आवश्यक आहे. तसेच, ओळखपत्राच्या छायांकित प्रतींवरील छायाचित्रही सुस्पष्ट असणे आवश्यक आहे. मूळ ओळखपत्रावर सुस्पष्ट छायाचित्र नसलेल्या उमेदवारांनी परीक्षेस उपस्थित रहाण्यापूर्वीच अद्ययावत/सुस्पष्ट छायाचित्राआधारे सक्षम प्राधिका-याकडून मूळ ओळखपत्र बदलून घ्यावे. परीक्षेच्या वेळी मूळ ओळखपत्रावरुन उपस्थित उमेदवाराची ओळख पटविणे शक्य न झाल्यास परीक्षेला प्रवेश नाकारला जाऊ शकतो. त्यामुळे होणा-या परिणामाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**५.** आयोगामार्फत यापुढे आयोजित करण्यात येणा-या सर्व परीक्षांकरीता उमेदवारांनी **परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक तास अगोदर** परीक्षा कक्षात हजर राहणे अनिवार्य आहे.

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:- मुंबई

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.